# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ७५–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. धोंडीराम तुकाराम शिंदे,<br>मु. पो. बेवनूर, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. धोंडीराम तुकाराम शिंदे, रा. बेवनूर, ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे नवीन घरगुती वीज कनेक्शन मिळणेसाठी योग्य ती फी भरुन दि. २४.९.२००७ रोजी अर्ज केला. त्यानंतर दि. ४.२.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे क्ष फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली. प्रस्तुतची तक्रार मंचामध्ये दि. १८.३.२०१० रोजी दाखल करण्यात आली.

वितरण कंपनीने आपल्या दि.३०.४.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांस दिनांक १९.४.२०१० रोजी चलन दिले आहे व टेस्ट रिपोर्ट व इतर कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर व पैंसे भरल्यानंतर कनेक्शन एस.ओ.पी.च्या मुदतीत देण्यात येईल असे नमूद केले आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ३.५.२०१० रोजी मंचासमोर सुनावणीस घेतली असतां, वि.प.तर्फे श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. राजमाने, कनिष्ठ अभियंता, जत उप विभाग उपस्थित. तक्रारदार गैरहजर. वितरण कंपनीने दि. १९.४.२०१० रोजी चलन दिले व तक्रारदार यांनी ती २४.४.२०१० रोजी भरली. परंतु तक्रारदार यांनी टेस्ट रिपोर्ट दिला नाही. वि.प.ने तक्रारदाराचे दि. ३०.४.२०१० च्या अर्जावर भर दिला. अर्जामध्ये तक्रारदाराने तक्रार मागे घेत असल्याचे लेखी दिले आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी दि. २४.९.२००७ ते १९.४.२०१० या कालावधीच्या विलंबासाठी तक्रारदार यांस भरपाई मिळणेच हक्क आहे व वि.प.ची ती देण्याची जबाबदारी आहे. परंतु तक्रारदाराच्या दि. ३०.४.२०१० च्या लेखी अर्जात चलन मिळाले आहे, माझी तक्रार दूर झाली आहे, त्यामुळे मला कोणतीही नुकसान भरपाई नको असे म्हटले असल्याने तक्रारदाराच्या भरपाईची मागणी निकाली काढणेत येत आहे.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) तक्रारदाराची विलंबापोटी मिळणाऱ्या नुकसान भरपाईची मागणी त्याने तक्रार मागे घेतल्याने फेटाळण्यात येत आहे.

३) तक्रारदाराच्या विद्युत कनेक्शनच्या मागणी बाबत टेस्ट रिपोर्ट व इतर कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नियमाप्रमाणे त्यांस विद्युत कनेक्शन द्यावे असे आदेश वि.प.स देणेत येत आहेत.

४) खर्चाबाबत आदेश नाही.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :